| विषय - मराठी ( लिंग) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | प्रश्न | पर्याय अ | ब | क | ड |
| १ | खालीलपैकी 'नपुंसकलिंगी' शब्द ओळखा. | मुलगा | नदी | पुस्तक | घोडा |
| २ | नामावरून एखादी व्यक्ती किंवा वस्तू ही पुरुष जातीची किंवा स्त्रीजातीची आहे की या दोन्हीपैकी कुठल्याही जातीची नाही, हे कळते त्याला काय म्हणतात?' | वचन | प्रयोग | समास | लिंग |
| ३ | भाऊ-बहीण' या सामासिक शब्दात कोणते लिंग आहे? | स्त्रीलिंग | पुल्लिंग | उभयलिंग | इतरेतर लिंग |
| ४ | खालीलपैकी कोणता शब्द नेहमी पुल्लिंगी असतो? | शाळा | सूर्य | खिडकी | झाड |
| ५ | नामाच्या रूपावरून एखादी वस्तू पुरुषजातीची की स्त्रीजातीची आहे हे कशावरून ओळखतात? | लिंग | सर्वनाम | नाम | यापैकी नाही |
| ६ | 'लिंग' (Gender) ही खालीलपैकी काय आहे? | जैविक रचना | सामाजिक व सांस्कृतिक रचना | शारीरिक गुणधर्म | जन्मजात स्थिती |
| ७ | वर्गात शिक्षकाने मुला-मुलींना समान संधी देणे हे कशाचे लक्षण आहे? | लिंग पूर्वग्रह | लिंग रुढीबद्धता | लिंग संवेदनशीलता | लिंग असमानता |
| ८ | "मुले गणितात हुशार असतात आणि मुली घरकामात चांगल्या असतात", हे विधान काय दर्शवते? | लिंग समानता | लिंग रूढी बद्धता | लिंग समता | वस्तुनिष्ठ सत्य |
| ९ | उंट या शब्दाचे स्त्रीलिंग रूप ओळखा. | उंटिन | उंटणी | सांड | सांडणी |
| १० | खालील शब्दापैकी नपुसकलिंग शब्द ओळखा. | वीज | सफाई | शरीर | काळजी |
| ११ | पुरणपोळी या शब्दाचे लिंग सांगा. | पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुसकलिंग | यापैकी एकही नाही |
| १२ | नपुसकलिंगी लेखन नसलेला शब्द ओळखा. | झाड | वासरू | फडके | पगडी |
| १३ | विद्वानचे स्त्रीलिंगी रूप कोणते ? | विद्वत्ता | विद्वाणीन | विद्या | विदुषी |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | पर्याय अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १४ | आंब्याची बाग घराच्या वरच्या बाजूला आहे. या वाक्यातील बाग या शब्दाचे लिंग ओळखा. | पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुसकलिंग | उभयलिंग |
| १५ | विधुर या शब्दाचा स्त्रीलिंगी शब्द कोणता ? | विदुषी | विदुशीन | विधवा | सधवा |
| १६ | वाघ्या या शब्दाचा विरुद्ध लिंगी शब्द सांगा. | वाघी | वाघीण | मुरळी | मुगळी |
| १७ | खालीलपैकी स्त्रीलिंगी गटातील शब्द कोणता ? | गाढव | कणव | देव | निरोप |
| १८ | राजहंस या नामाचे स्त्रीलिंगी रूप कोणते होईल ? | राजहंस | राजहंसी | राजहंसिका | राजहंसिनी |
| १९ | वाघ या शब्दाचे बरोबर स्त्रीलिंगी रूप ओळखा. | वाघीण | वाघीन | वाघिण | वाघिन |
| २० | विशेष नावे व भाववाचक नामे नेहमी कोणत्या वचनात वापरली जातात. | एक वचनी | अनेकवचनी | बहुवचनी | यापैकी नाही |

| प्रश्न क्रमांक | बरोबर उत्तरचा पर्याय | प्रश्न क्रमांक | बरोबर उत्तरचा पर्याय |
|---|---|---|---|
| १ | क | ११ | ब |
| २ | ड | १२ | ड |
| ३ | क | १३ | ड |
| ४ | ब | १४ | ब |
| ५ | अ | १५ | क |
| ६ | ब | १६ | क |
| ७ | क | १७ | ब |
| ८ | ब | १८ | ब |
| ९ | ब | १९ | अ |
| १० | क | २० | अ |